# महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई

Web Side- www.jdteromumbai.com Email-jtdirrom@gmail.com

दूरध्वनी क्रमांक – (०२२) २६४७४८९२ / २६४७१६१९

## गट 'क' व गट- 'ड' संवर्गातील अपंगाचा व मागासवर्गीयांचा अनुशेष तसेच खुल्या प्रवर्गातील रिक्त पदांसाठी जाहिरात.

सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई या कार्यालयाच्या अंतर्गत अपंग, मागासवर्गीय व खूल्या प्रवर्गाकरीता रिक्त असलेल्या पदांकरिता निवड व प्रतिक्षायादी तयार करणेसाठी इच्छुक उमेदवारांकडून दिनांक- १५/०४/२०१३ संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जाचे लिफाफ्यावर ठळक अक्षरात "----------------------------- या पदासाठी अर्ज" असे लिहिण्यात यावे.

| अ. क्रं | पदाचे नांव व वेतनश्रेणी / ग्रेड पे | समांतर आरक्षण | अ.जा. | अ.ज. | विजा (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | संवर्ग – गट-क | | | | | | | | | | | |
| १. | लिपिक-टंकलेखक<br>**Clerk-cum-Typist**<br>(वेतनबॅण्ड रु.५२००-२०२००, ग्रेड पे-१९००)<br>**(Pay Band Rs.5200-20200/- Grade Pay Rs.1900/-)**<br>ग्रामीण संवर्गातील लिपिक-टंकलेखकांची पदे (मुंबई शहर व उपगनर वगळून) | माजी सैनिक | - | - | - | - | - | - | - | - | १ | २ |
| | | सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | - | - | १ | |
| २. | तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक<br>**Technical Lab Assistant**<br>(वेतनबॅण्ड रु.५२००-२०२००,ग्रेड पे-२४००)<br>**(Pay Band Rs.5200-20200/- Grade Pay Rs.2400/-)** | सर्वसाधारण | - | १ | १ | - | - | - | - | - | १ | ४ |
| | | महिला | | | | | | | | | १ | |
| ३. | कुशल कारागीर (चर्मकला)<br>**Skilled Workman (Leather)**<br>(वेतनबॅण्ड रु.५२००-२०२००,ग्रेड पे-१९००)<br>**(Pay Band Rs.5200-20200/- Grade Pay Rs.1900/-)** | सर्वसाधारण | - | १ | - | - | - | - | - | - | | १ |
| ४. | यांत्रिकी / यंत्रकारागीर<br>**Machinist/Machine Mechanic**<br>(वेतनबॅण्ड रु.५२००-२०२००,ग्रेड पे-२४००)<br>**(Pay Band Rs.5200-20200/- Grade Pay Rs.2400/-)** | अपंग (अस्थीव्यंग OL कर्णबधीर HH क्षीणदृष्टी LV) | - | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| ५. | लोहार<br>**Black Smith**<br>(वेतनबॅण्ड रु.५२००-२०२००,ग्रेड पे-२४००)<br>**(Pay Band Rs.5200-20200/- Grade Pay Rs.2400/-)** | सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| ६. | यंत्रपरीचर (मुद्रण)<br>**Machine Attendent (Printing)**<br>(वेतनबॅण्ड रु.५२००-२०२००,ग्रेड पे-१९००)<br>**(Pay Band Rs.5200-20200/- Grade Pay Rs.1900/-)** | सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | १ | - | १ | २ |
| ७. | निदेशक (मुद्रण)<br>**Instructor (Printing)**<br>(वेतनबॅण्ड रु.९३००-३४८००,ग्रेड पे-४३००)<br>**(Pay Band Rs.9300-34800/- Grade Pay Rs.4300/-)** | सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |

| अ. क्रं | पदाचे नांव व वेतनश्रेणी / ग्रेड पे | समांतर आरक्षण | अ.जा. | अ.ज. | विजा (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | विमाप्र | इमाव | खुला | एकूण पदे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८. | उपकरण यांत्रिकी<br>**Instrument Mechanic**<br>(वेतनबॅण्ड रु.५२००-२०२००,ग्रेड पे-२४००)<br>**(Pay Band Rs.5200-20200/- Grade Pay Rs.2400/-)** | सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| ९. | लघुलेखक निम्नश्रेणी<br>**Stenographer (Lower Grade)**<br>(वेतनबॅण्ड रु.९३००-३४८००,ग्रेड पे-४३००)<br>**(Pay Band Rs.9300-34800/- Grade Pay Rs.4300/-)** | सर्वसाधारण | - | १ | - | - | - | - | - | - | - | १ |
| १० | डाटा एन्ट्री ऑपरेटर<br>**Data Entry Operator**<br>(वेतनबॅण्ड रु.९३००-३४८००,ग्रेड पे-४२००)<br>**(Pay Band Rs.9300-34800/- Grade Pay Rs.4200/-)** | सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |
| ११ | वाहनचालक<br>**Driver**<br>(वेतनबॅण्ड रु.५२००-२०२००,ग्रेड पे-१९००)<br>**(Pay Band Rs.5200-20200/- Grade Pay Rs.1900/-)** | सर्वसाधारण | १ | - | - | - | - | - | - | - | - | १ |
| | **संवर्ग – गट-ड** | | | | | | | | | | | |
| १. | शिपाई<br>**Peon**<br>(वेतनबॅण्ड रु.४४४०-७४४०,ग्रेड पे-१३००)<br>**(Pay Band Rs.4440-7440/- Grade Pay Rs.1300/-)** | सर्वसाधारण | - | - | १ | - | - | - | - | - | ३ | ५ |
| | | महिला | | | | | | | | | १ | |
| २. | हमाल<br>**Hamal**<br>(वेतनबॅण्ड रु.४४४०-७४४०,ग्रेड पे-१३००)<br>**(Pay Band Rs.4440-7440/- Grade Pay Rs.1300/-)** | अपंग (अस्थीव्यंग OL कर्णबधीर HH क्षीणदृष्टी LV) | - | - | १ | - | - | - | - | - | - | ३ |
| | | सर्वसाधारण | - | - | - | १ | १ | - | - | | - | |
| ३. | प्रयोगशाळा परिचर<br>**Laboratory Attendant**<br>(वेतनबॅण्ड रु.४४४०-७४४०,ग्रेड पे-१३००)<br>**(Pay Band Rs.4440-7440/- Grade Pay Rs.1300/-)** | सर्वसाधारण | १ | १ | - | | | | - | - | ४ | ९ |
| | | महिला | - | - | १ | | | | - | १ | १ | |
| ४. | ग्रंथालय परिचर<br>**Library Attendant**<br>(वेतनबॅण्ड रु.५२००-२०२००,ग्रेड पे-१९००)<br>**(Pay Band Rs.5200-20200/- Grade Pay Rs.1900/-)** | सर्वसाधारण | - | - | - | - | - | - | - | - | १ | १ |

<u>पदभरतीचे वेळापत्रक खालीलप्रमाणे.</u>

१. ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक – दि.१५.४.२०१३

२. ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज डि.डि. व प्रमाणपत्रांच्या प्रतीसहीत या कार्यालयात पोहोचण्याचा अंतिम दिनांक – १७.०४.२०१३

३. पात्र व अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक – दि.२६.०४.२०१३

४. लेखी / प्रात्यक्षिक परीक्षेचा दिनांक – दि.२९.४.२०१३ व दि.३०.४.२०१३

पदनिहाय मुलाखतीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी व पदनिहाय मुलाखतीचा दिनांक उमेदवारांच्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेनंतर संकेतस्थळावर जाहिर करण्यात येईल.

उपरोक्त वेळापत्रकात काही प्रशासकीय / तांत्रिक कारणाने बदल झाल्यास वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**उपनिर्दिष्ट सर्व पदांसाठी शैक्षणिक अर्हता, अनुभव आणि अन्य अटी खालीलप्रमाणे असतील.**

| अ.क्र. | पदनाम | किमान शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| | | **गट-क** |
| १. | लिपिक-टंकलेखक | १.माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण. २.मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. |
| २. | तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक | १.माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण. २. अभियांत्रिकी शाखेतील पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण ३.संबधित क्षेत्रातील १ वर्षाचा प्रयोगशाळा सहाय्यक / मॅन्युफॅक्चरिंग / सर्व्हिसिंग / मेन्टेनन्स / डिझाईन अनुभव व **C.N.C.** मशीन हाताळण्याचा अनुभव. |
| ३. | कुशलकारागीर (चर्मकला) | १.माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण. २. लेदर टेक्नॉलॉजीमधील प्रमाणपत्र वा समतूल्य परीक्षा उत्तीर्ण. ३.कमर्शीयल टॅनरीमधील कामाचा १ वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| ४. | यांत्रिकी / यंत्रकारागीर | १. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, २. आय.टी.आय. यांत्रिकी/यंत्रकारागीर अभ्यासक्रम उत्तीर्ण. किंवा एन.सी.टी.व्ही.टी. अभ्यासक्रम उत्तीर्ण. |
| ५. | लोहार | १.माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण २. आय.टी.आय. लोहार अभ्यासक्रम उत्तीर्ण किंवा एन.सी.टी.व्ही.टी. अभ्यासक्रम उत्तीर्ण |
| ६. | यंत्रपरीचर (मुद्रण) | १.माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, २. मुद्रणशास्त्रातील प्रमाणपत्र वा समतूल्य अभ्यासक्रम उत्तीर्ण. ३.मुद्रणालयातील मशीनची माहिती व दुरुस्ती करण्याचा एक वर्षाचा अनुभव |
| ७. | निदेशक (मुद्रण) | १. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण. २. प्रिंटींग टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमाची पदविका उत्तीर्ण. |
| ८. | उपकरण यांत्रिकी | १. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, २. आय.टी.आय. इन्स्ट्रूमेंट मेकॅनिक अभ्यासक्रम उत्तीर्ण. संबंधीत उपकरण यांत्रिकी या व्यवसायातील पाच वर्षाचा अनुभव आवश्यक किंवा एन.सी.टी.व्ही.टी. इन्स्ट्रूमेंट मेकॅनिक असल्यास संबंधीत उपकरण यांत्रिकी या व्यवसायातील चार वर्षाचा अनुभव |
| ९. | लघुलेखक निम्नश्रेणी | १. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण.<br>२. लघुलेखन १०० श.प्र.मि. वेग परीक्षा उत्तीर्ण असल्याचे जी.सी.सी. प्रमाणपत्र.<br>३. इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. वेग परीक्षा उत्तीर्ण असल्याचे जी.सी.सी. प्रमाणपत्र. |
| १०. | डाटा एन्ट्री ऑपरेटर | १. माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण, २.डाटा एन्ट्री ऑपरेटर अभ्यासक्रम चालविणा-या शासन मान्यता प्राप्त संस्थेचे लाईन/ ऑफ लाईन डाटा एन्ट्री यंत्रावरील काम करताना ताशी दहा हजार की डिप्रेशन वेग असल्याचे प्रमाणपत्र. ३. इंग्रजी टंकलेखनातील कमीत कमी ४० श.प्र.मि. किंवा मराठी टंकलेखनातील ३० श.प्र.मि. वेग मर्यादा असलेले शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र असावे.<br>२. महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कॉम्प्युटर ऑपरेटर प्रमाणपत्र अभ्यासक्रम किंवा राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परीषदेचे डाटा प्रिपरेशन आणि कॉम्प्युटर सॉफ्टवेअर प्रमाणपत्र अभ्यासक्रम परीक्षा उत्तीर्ण असेल तर अशा उमेदवारांना प्राधान्य. |
| ११. | वाहनचालक | १.शासनमान्य शाळेतील इयत्ता ४थी परीक्षा उत्तीर्ण २.मोटार वाहन चालविण्याचा वैध असलेला परवाना आवश्यक ३.मोटार चालवितांना नियम तोडल्यामूळे किंवा अपघातामूळे कोणत्याही फौजदारी गुन्हा असता कामा नये. ४.वाहनासंबधी संपूर्ण ज्ञान व वाहनचालनासंबधी संपूर्ण ज्ञान आवश्यक ५.कमीत कमी १ वर्षाचा वाहन चालविण्याचा अनुभव आवश्यक. |
| | | **गट-ड** |
| १. | शिपाई | शासनमान्य शाळेतील इयत्ता ४थी परीक्षा उत्तीर्ण. |
| २. | हमाल | शासनमान्य शाळेतील इयत्ता ४थी परीक्षा उत्तीर्ण. |
| ३. | प्रयोगशाळा परिचर | शासनमान्य शाळेतील इयत्ता ७वी परीक्षा उत्तीर्ण. |
| ४. | ग्रंथालय परिचर | माध्यमिक शालांत परीक्षा उत्तीर्ण |

१. सर्व उमेदवारांनी **www.jdteromumbai.com** या संकेतस्थळावर जाऊन अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन भरलेल्या अर्जाची मुद्रीत प्रत **(Print Copy)** सर्व कागदपत्रे व डी.डी. (धनाकर्ष) सहीत या कार्यालयात दि.१७.४.२०१३ संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत या कार्यालयास प्राप्त होईल या बेताने पाठविण्यात यावी.

२. माजी सैनिक कार्यालय, रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय यांचेकडे नोंदणी केलेले व त्या कार्यालयाने शिफारस केलेल्या यादीतील समाविष्ट असलेल्या उमेदवारांनी सुध्दा ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

**सर्वसाधारण अटी-**

१) उमेदवाराचे वय दि.१.४.२०१३ रोजी किमान १८ वर्षे व कमाल ३३ वर्षे.(मागासवर्गीयांकरिता ३८ वर्षे.) शासकीय कर्मचा-यांना उच्चतम वयोमर्यादा लागू असणार नाही.

२) उमेदवारांना मराठी भाषेचे पर्याप्त ज्ञान असणे आवश्यक.

३) शासन अधिसूचना एसआरव्ही २०००/प्रक्र(१७/२०००)/बारा, दि.२८.३.२००५ नुसार नमुना "अ" नियम ४ प्रमाणे लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

४) शासन निर्णय क्र.अनियो १००५/१२६/सेवा-४, दि.३१.१०.२००५ प्रमाणे परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहिल.

५) वित्त विभाग परिपत्रक क्रमांक अनियो१००६/८७/सेवा-४ दि.१२ जानेवारी २००७ व वित्त विभाग परिपत्रक क्रमांक अनियो१००९/१३/सेवा-४ दि.२४ फेब्रुवारी २००९ मधील सर्व अटींची पुर्तता होत असल्यासच शासकीय कर्मचा-यास महाराष्ट्र नागरी सेवा(निवृत्ती वेतन) नियम १९८२ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागु होईल.

**६) महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२२ जानेवारी २००४ च्या कलम ४(३) अन्वये विजा/भ.ज. प्रवर्गातील पदे प्रवर्गासाठी विहित केलेले आरक्षण अंतर्गत परिवर्तनीय असेल.**

**७) समांतर आरक्षणातील योग्य उमेदवार उपलब्ध न झाल्यास संबंधीत प्रवर्गातील सर्वसाधारण उमेदवाराचा त्यासाठी विचार केला जाईल.**

८) मागासवर्गातील उमेदवारांनी अर्जासोबत सक्षम अधिका-यांनी दिलेल्या जातीच्या प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत व उपलब्ध असल्यास जाती वैधतेच्या प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत जोडणे आवश्यक आहे.

९) मागास प्रवर्गातील आरक्षण हे महाराष्ट्र राज्याच्या अधिवासी उमेदवारापुरते मर्यादित राहील.

१०) सर्व पदासाठी एमएससीआयटी अथवा **D.O.E.A.C.C.** सोसायटीच्या अधिकृत **C.C.C** किंवा **O** स्तर किंवा **A** स्तर किंवा **B** स्तर किंवा **C** स्तर पैंकी कोणतीही एक प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण हि अनिवार्य अर्हता निश्चीत केलेली असल्याने ते प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. जर विहित प्रमाणपत्र नसल्यास, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९.३.२००३ नुसार नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत विहित प्रमाणपत्र उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. विहित मुदतीत संगणक हाताळणी/ वापराबाबतचे प्रमाणपत्र सादर न केल्यास तात्काळ सेवा समाप्त करण्यात येईल.

११) अर्ज सर्व दृष्टींनी पूर्ण असावेत आणि विहित नमुन्यामध्ये नसलेले, व अपूर्ण अर्ज फेटाळण्यात येतील.

१२) एकापेक्षा अधिक पदांकरिता अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक पदाकरिता स्वतंत्र अर्ज करावा.

१३) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नोंदणी केली असल्यास नोंदणी क्रमांक अर्जात नमूद करावा. व प्रमाणपत्राची छायांकित प्रत जोडावी.

१४) शासकीय/ निमशासकीय अन्यथा अन्य प्रकारच्या नोकरीत असलेल्या उमेदवारांनी नियुक्ती अधिकाऱ्याचे मुलाखतीचे वेळी नाहरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.अन्यथा मूलाखत नाकारली जाईल.ज्या पदासाठी केवळ लेखी परीक्षेच्या आधारे निवड करावयाची आहे अश्यांनी प्रमाणपत्रे तपासणीचे वेळी ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

**१५) पत्रव्यवहाराचा पत्ता सुस्पष्ट व सविस्तर असावा.**

१६) अर्ज छाननी व नोंदणी शुल्क खुल्या संवर्गातील उमेदवारांना रुपये ५०० व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रुपये ३००/- चा धनाकर्ष जोडणे आवश्यक आहे.तो " **मुंबई " येथे देय असावा**. धनाकर्ष **"सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई"** यांच्या नांवे काढण्यात यावा.

**१७) उमेदवारांना लेखी/ चाळणी परीक्षा / प्रात्यक्षिक परीक्षेसाठी व मुलाखतीसाठी मुलाखती स्थळी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. त्यांची निवड झाल्यास या विभागाच्या अधीनस्त बृहन्मुंबईसह मुंबई (उपनगर), ठाणे, रायगड,रत्नागिरी, सिंधुदूर्ग या जिल्हयातील कोणत्याही कार्यालय/संस्थेमध्ये त्यांची नियुक्ती करण्यात येईल व त्यांची सेवा या विभागातील कोणत्याही कार्यालय/ संस्थेमध्ये बदली पात्र असेल.**

१८) वि.जा.व भटक्या जमाती , इतर मागासवर्ग व विमाप्र उमेदवारानी समाजाच्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे दि.३१ मार्च २०१२ पर्यतचे वैध असलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे, अन्यथा त्याचा आरक्षित पदासाठी विचार केला जाणार नाही.

१९) अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी असलेले आरक्षण शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रं.रक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२ दि.३० एप्रिल २००५ मधील तरतुदीनुसार राहील. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेऊन उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यत शिथिलक्षम राहील. खेळाडू प्रमाणपत्र हे राष्ट्रीय व राज्यस्तरावरील (शासन निर्णय परिशिष्ठ अ मधील नमूद) खेळाचे व प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-याचे असावे.

**२०) अर्ज "सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, बांद्रा (पूर्व), मुंबई- ४०० ०५१" या पत्त्यावर पाठवावेत. व पाकिटावर पदाचे नाव स्पष्ट व ठळक अक्षरात लिहावे.**

२१) पोस्टाची दिरंगाई अथवा इतर अन्य कोणत्याही कारणामुळे विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार न करता ते रद्द ठरविण्यात येतील.

२२) अर्जामध्ये भरलेल्या माहितीच्या पृष्ठयर्थ आवश्यक त्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.अन्यथा असे अर्ज रद्दबातल ठरविले जातील.

**२३) जाहीरातीत नमूद अर्हता किमान शैक्षणिक अर्हता दर्शवितात. त्यापेक्षा उच्च अर्हताधारक उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल.**

२४) शासन तरतूदीनुसार पदवीधर / पदवीकाधारक अंशकालीन कर्मचारी, भूकंपग्रस्त / प्रकल्पग्रस्त, अपंग, माजी सैनिक इत्यादींना वयोमर्यादेत अनुज्ञेय असलेली सूट संबधित प्रवर्गातील उमेदवारांसाठी लागू राहील.

२५) पूर्णवेळ कामाचा अनुभव ग्राहय धरला जाईल. अर्धवेळ मानधनावरील सेवा ग्राहय धरली जाणार नाही.

२६) महिला आरक्षणाची तरतूद शासन निर्णय महिला व बालकल्याण विभाग ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२ दि.२५ मे २००१ नुसार राहील.

२७) निवड प्रक्रियेदरम्यान व तदनंतर उमेदवारांनी सादर केलेली प्रमाणपत्रे संशयास्पद वा अयोग्य / अपर्याप्त आढळल्यास उमेदवारांची निवड / नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द केली जाईल.

२८) पदभरतीबाबतचे संपूर्ण वेळापत्रक **www.jdteromumbai.com** या संकेतस्थळावर घोषित करण्यात येईल. व त्याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

विशेष सूचना

१) संदर्भहू जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज विहित मुदतीत या कार्यालयास प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही संदर्भातील यापूर्वी या कार्यालयास प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत याची कृपया नोंद घ्यावी.

२) अर्जांची संख्या जास्त असल्यास निकष ठरवून त्याआधारे अर्जाची छाननी करुन उमेदवाराची संख्या मर्यादित केली जाईल.व त्यानंतर आवश्यकतेनूसार लेखी परीक्षा व प्रात्यक्षिक परीक्षा घेवून त्या आधारे मर्यादित उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविले जाईल.

३) अतिरिक्त संवर्ग, आंतरविभागीय समायोजन व विभागीय बदली / पदांचा आढावा व पदांचे पुनर्जिवन न होणे इ. वा अन्य कारणामुळे पदसंख्येत (पदसंख्या कमी / जास्त वा शुन्य होणे) व आरक्षण/ समांतर आरक्षणामध्ये बदल होण्याची शक्यता आहे. तसेच या व अन्य कारणामुळे निवड प्रक्रिया कोणत्याही टप्प्यावर रद्द केली जाईल.

४) पदभरतीची प्रक्रिया अत्यंत तर्कशुध्द व पारदर्शक पध्दतीने गुणवत्तेच्या आधारे पार पाडली जाणार असल्याने कोणीही कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये.

५) निवडीसाठी शिफारस अथवा दबाव आणल्यास उमेदवार निवड व नियुक्तीसाठी अपात्र ठरविला जाईल.

६) रोजगार व स्वयंरोजगार कार्यालय व अन्य प्राधिकरणे यांचेकडून प्राप्त होणा-या यादीतील उमेदवारांनासुध्दा जाहीरातीतील सर्व सूचना / बाबी लागू होतील.

७) अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत उमेदवारांनी धारण केलेली अर्हताच विचारात घेतली जाईल.त्यानंतर सादर केलेली कोणतीही कागदपत्रे विचारात घेतली जाणार नाही.

८) निकषानुसार छाननीनंतर अपात्र ठरलेल्या उमेदवारांची नावे कार्यालयाचे **www.jdteromumbai.com** या संकेतस्थळावर दर्शविण्यात येतील. त्यासाठी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही.

९) जाहीरातीच्या अनूषंगाने कार्यवाही न करण्याचे वा ती रद्द करण्याचे अधिकार सहसंचालकांनी राखून ठेवले आहेत.

( जी.बी.धनोकार )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई.